साप्ताहिक

पत्रकारितेचे मूल्य जतन करणारे वृत्तपत्र...

# न्यायस्वातंत्र्य समता

RNI NO.: MAHARAR/2010/36016

संपादक : रमेश अ. शेळके कार्यकारी संपादक : ॲड. चंद्रकांत गायकवाड

Website : nyayswatantryasamata.weebly.com

● वर्ष : ५ ● अंक : ४८ वा ● सोमवार दि. २८ डिसेंबर ते ३ जानेवारी २०१५ ● पुणे ● पाने : ४ ● किंमत २ रुपया

## दैनंदिन दिनचर्येत योगाचे महत्वाचे स्थान : श्रीपाद नाईक

**पिंपरी (प्रतिनिधी) :** दैनंदिन दिनचर्येत योगाला महत्वाचे स्थान असून जागतिक पातळीवर योगाला आदर्श चोकित्सा पध्दती म्हणुन स्विकारले असल्याचे प्रतिपादन केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाचे मंत्री श्रीपाद नाईक यांनी लोणावळ्यात केले.

लोणावळ्यातील कैवल्यधाम या आंतरराष्ट्रीय योग संस्थेमध्ये आज पासून सुरु झालेल्या आठव्या जागतिक योगा परिषदेचे उद्घाटन आयुष मंत्रालयाचे मंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.



योगगुरु स्वामी अध्यात्मनंदजी, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश बी. आर. श्रीकृष्ण, भारत सरकारच्या माध्यमिक शिक्षण व साक्षरता विभागाचे सचिव डॉ. सुभाषचंद कोटिया, कैवल्यधाम योग संस्थेचे सचिव स्वामी महेशानंदजी, परिषदेचे आयोजक सचिव सुबोध तिवारी आदी यावेळी उपस्थित होते. या परिषदेमध्ये भारतातील विविध राज्यांमधील ७०० प्रतिनिधी व विविध १२ देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. २७ ते ३० डिसेंबर दरम्यान ह्या परिषदेत विचारविमर्श होणार आहे.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना श्रीपाद नाईक म्हणाले विश्वाला जोडण्याचे काम करणार्या योग साधनेचा दैनंदिन जीवनात समावेश करण्याच्या धर्तीवर आयुष मंत्रालत काम करत आहे. जगात सर्वत्र योगाला आत्मसात केले आहे. ते जगण्याचे शास्त्र असुन योग साधनेमुळे मनाचे व तनाचे स्वास्थ राखले जात असल्याने या आयुष पध्दतीच्या प्रचार व प्रसार करण्यावर मंत्रायल भर देत आहे.

स्वामी अध्यात्मनंदजी म्हणाले योगा हे शास्त्र आहे ते आत्मसाथ केल्यास मनुष्य शारिरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम होईल योग शिक्षकांनी योगाचा व योगासनांचा खोलवर अभ्यास करुन ते ज्ञान इतरांना द्या.

जागतिक स्तरावर अभ्यासक्रमात योगाला अविभाज्य स्थान मिळावे यावर या चार दिवशीय शिबिरात मंथन व मार्गदर्शन होणार आहे. उद्घाटन समारंभ कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुबोध तिवारी यांनी केले.

## आपली संस्कृती आणि आपल्या मातीचे वैभव बघून समाधान वाटतो : डॉ. सबनीस

**पिंपरी (प्रतिनिधी) :** ग्रंथ दिंडी आणतानाचा लहान चिमुकल्यांचा उत्साह बघण्यासारखा होता. मराठी संस्कृतीचे अंतरंग खर्‍या अर्थाने बघायला मिळाले. मराठी संस्कृती अजूनही पिंपरी-चिंचवड परिसरामध्ये जिवंत आहे. याचा मला खूप आनंद होत आहे. लोप पावत चाललेल्या आपल्या संस्कृतीचा आणि आपल्या मातीचे वैभव पाहून समाधान वाटते, असे मत ८९ वे अखिल भरतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजीत अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.



८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने पिंपरीताल डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या एक दिवसीय संमेलन पूर्व संमेलनामध्ये ते बोलत होते. यावेळी संमेलनाचे उद्घाटन ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, डॉ. श्रीपाल सबनीस, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा माधवी वैद्य आणि २४ व्या विभागीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रामचंद्र देखणे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यवाह आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवड शाखा अध्यक्ष राजन लाखे आदी उपस्थित होते.

एक दिवसीय संमेलन पूर्व संमेलन ही अतिशय नाविन्यपूर्ण कल्पना आहे. रसिकांनी संमेलना अगोदर संमेलान दाखविल्यानंतर रसिकांमध्ये उत्सुकता बघायला मिळत आहे. असे सदानंद मोरे यांनी व्यक्त केले. जेव्हा कोणताही चित्रपट प्रदर्शित करायचा असतो तेव्हा त्याची विविध प्रोमोद्वारे प्रसिद्धी करतात. त्याच प्रमाणे एक दिवसीय संमेलन पूर्व संमेलन हे त्याचे एक चांगले उदाहरण आहे.

संमेलन हा एक गाव असतो. गाव चांगला करायचा असेल तर पाटीलही चांगलाच पाहिजे. संमेलनामध्ये श्रम आणि शब्द यांची चांगली जोडी बघायला मिळते. कामगारांच्या श्रमाशिवाय हे संमेलन यशस्वी होऊ शकत नाही आणि संमेलनामध्ये श्रम आणि शब्दसंस्कृती बघाण्याचा हा चांगला अनुभव आहे. असे मत डॉ. रामचंद्र देखणे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनेतून करण्यात आली. प्रसिद्ध कथक नृत्यगांना डॉ. पंडित नंदकिशोर आणि त्यांचे सहकारी यांनी गणेश वंदनाची प्रस्तुती केली. ज्यामध्ये तबला आणि घुंघरू यांची उत्तम जुगलबंदी बघायला मिळाली. रसिक ही जुगलबंदी बघून मंत्रमुग्ध झाले होते.

## राज्यात सलग तिसर्‍या दिवशीही पुण्यात थंडीचा कडाका

**पुणे (प्रतिनिधी) :** उत्तरेकडील भागातून वाहणारे थंड वारे आणि जम्मू-काश्मीरमध्ये सुरू असलेली हिमवृष्टी यामुळे राज्यात थंडीचा कडाका वाढला आहे. दरम्यान रविवारी नांदेड येथे सर्वात कमी म्हणजे ४.५ अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आले. तर पुढील दोन दिवसांत थंडीचा कडाका कमी होण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे.



उत्तरेकडील राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात थंडीची लाट आली आहे. परिणामी राज्याचा पाराही खाली घसरला आहे. गेल्या दोन दिवसांपासून राज्यात बोचरी थंडी वाढली असून, दिवसाही थंडीचा कडाका जाणवत आहे. गेल्या २४ तासांत मराठवाडा आणि विदर्भात थंडीची लाट होती. थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वरपेक्षाही उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात निचांकी तापमानाची नोंद झाली आहे. मराठवाड्यात परभणी, औरंगाबाद, उस्मानाबादसह अनेक ठिकाणी पारा १० अंश सेल्सिअसच्या खाली आला आहे. मध्य महाराष्ट्रात अनेक भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली आहे. कोकण-गोव्याच्या काही भागात, तर मराठवाडा आणि विदर्भाच्या उर्वरित भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. राज्याच्या उर्वरित भागात किमान तापमान सरासरीच्या जवळपास होते. देशात सर्वांत कमी किमान तापमान मध्य प्रदेशातील उमारी येथे २.९ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले आहे. या शिवाय मुंबईतही पारा खाली आला आहे.

राज्यातील काही प्रमुख शहरांचे किमान तापमान अंश सेल्सिअसमध्ये पुढीलप्रमाणे : मुंबई २०.३, सांताप्रुझ १४.४, अलिबाग १७.३, रत्नागिरी १८.७, डहाणू १५.५, भिरा १३.५, पुणे ६.८, जळगाव ७.८, कोल्हापूर १५.३, महाबळेश्वर १२.१, मालेगाव ९, नाशिक ८.२, सांगली १६.४, सातारा १२.५, उस्मानाबाद ९.८, औरंगाबाद ८.४, परभणी ८, अकोला ८.६, अमरावती १०.८, ब्रम्हपुरी १०.५, चंद्रपूर ११.२, गोंदिया ७.७, नागपूर १०.१, वर्धा ९.४, तर पणजी २०.२

## संक्षिप्त बातम्या

### छळाला कंटाळून वाकडमध्ये विवाहितेची आत्महत्या; पतीस अटक

**पिंपरी (प्रतिनिधी) :** मुलांच्या शिक्षणासाठी माहेराहून पैसे आणण्याच्या मागणीसाठी पतीकडून होत असलेल्या छळाला कंटाळून विवाहितीने घरातील फॅनला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना शनिवारी (दि.२६) सकाळी पहाटे पाचच्या सुमारास रहाटणी येथे उघडकीस आली.

माधुरी बालाजी शिरसाठे (वय २५, रा. रहाटणी, वाकड) असे आत्महत्या केलेल्या विवाहितीचे नाव असून तीचा पती बालाजी अभिमन्यू शिरसाठे ( रा. रामनगर, रहाटणी) याला अटक करण्यात आली आहे. यासंदर्भात विवाहितीचे वडील गणेश बागडे (वय ५०, रा. रहाटणी, चिंचवड) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माधुरी आणि बालाजी यांचा २०१० मध्ये विवाह झाला होता. त्यांना दोन मुले आहेत. मुलांच्या शिक्षणासाठी माहेराहून पैसे आण असे म्हणत बालाजी तीचा वेळोवेळी शारिरीक व मानसिक छळ करत होता. तसेच तीला मारहाण करत होता. या छळाला कंटाळून माधुरीने शनिवारी पहाटेपाचच्या सुमारास राहत्या घरी फॅनला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक व्हि. एस. धुमाळ अधिक तपास करत आहेत.

### खडकवासल्याचे पुनरुज्जीवन

**पुणे (प्रतिनिधी) :** खडकवासला धरणातील गाळ काढण्यासाठी आता लष्करी जवानांची नेमणूक करण्यात आली आहे. गेल्या वर्षभरापासून ग्रीन थंब या पर्यावरण प्रेमी संस्थेबरोबरच सामाजिक संस्था, गणेश मंडळे यांनी पाच लाख टन गाळ काढला आहे. महाराष्ट्र शासनाने आता लष्करी जवानांबरोबर दोन बुलडोझर, डंपर तसेच जेसीबी मशीन दिल्यामुळे या कामाला आता वेग येणार आहे. खडकवासला धरणातील गाळ काढला जात असल्याने धरणाचे पुनरुज्जीवन होऊन पाणीपातळी वाढण्यास मदत होणार आहे.

# संपादकीय...

## दलिताच्या मंदिर प्रवेशावरून मोठे धर्मजागरण

महाराष्ट्रात १९६० च्या दशकात दलिताच्या मंदिर प्रवेशावरून मोठे धर्मजागरण झाले. साधारणतः मोठ्या मंदिरातून आता दलितांना किंवा पूर्वास्पश्यांना प्रवेशबंदी नाही. परंतु खेड्यापाड्यामधून दलित समाज मंदिरापासून दूरच आहे. एखादा दलित माणूस एखाद्या मारुतीच्या मंदिराच्या पायरीवर जरी बसला तरी त्याला सवर्णांकडून मारहाण होते अशा काही बातम्या नित्य ऐकण्यात येतात. शनी शिंगणापूरच्या मंदिरावरून आता असाच वाद जारी आहे. शनी मंदिरातील महिलांच्या प्रवेशावरून महाराष्ट्रात सामाजिक जीवनामध्ये मोठे वादळ निर्माण झाले आहे. सातारा जिल्ह्यातील सोळशी या गावात पुन्हा एकदा असाच प्रकारे घडला आहे. तिथे महिलांना बंदी केली नाही परंतु महिला दर्शन घेऊन गेल्यानंतर मंदिर गोमूत्राने शुध्द करून घेतले आहे. हिंदू धर्मामध्ये विशेषतः महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर इत्यादी समाजसुधारकांनी समाजाच्या उत्कर्षासाठी अशा प्रकारच्या रूढींच्या विरुध्द संघर्ष उभे केले आणि त्यात धैऱ्याने सहभागी होऊन समाजाची सुधारणा घडवून आणली. सध्या अहमदनगर जिल्ह्यातल्या शनी शिंगणापूर मंदिरातील महिलांच्या प्रवेशावरून अशाच प्रकारचा एक वैचारिक संघर्ष उभा राहिलेला दिसत आहे. खरे म्हणजे हिंदू धर्मात अशा प्रकारचे आदेश कोठे लिहिलेले आहेत असे काही आढळत नाही. आज २५ डिसेंबर हा दिवस भारत सरकार सुशासन दिन म्हणून साजरा करणार आहे. परंतु महाराष्ट्रातल्या पुरोगामी विचारवंतांच्या दृष्टीने या दिवसाला एक वेगळे महत्त्व आहे. १९२७ साली याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीची होळी केली होती. मनुस्मृती हे विषमतेचे द्योतक आहे. सर्वसाधारण हिंदू लोक धार्मिक आचार म्हणून किंवा सामाजिक नियम म्हणून ज्या गोष्टींचे पालन करतात त्या गोष्टी मनुस्मृतीमध्ये नमूद केलेल्या आहेत. विशेषतः मनुस्मृतीमध्ये जातीय विषमतेचे मोठे समर्थन केलेले आहे. उच्च जातीच्या लोकांनी कनिष्ठ जातीतल्या लोकांशी कसा व्यवहार करावा याचे नियम सांगताना अतीशय विषमता दाखवलेली आहे. त्यातल्या त्यात चातुर्वण्यामध्ये ज्यांचा उल्लेख शूद्र म्हणून केला जातो त्यांच्यावर अनेक प्रकारचे निर्बंध घालण्याचे समर्थन याच ग्रंथामध्ये केलेले आहे. विषमतेच्या ज्वाला केवळ शूद्रांनाच नव्हे तर उच्चवर्णातील महिलांनासुध्दा होरपळून काढत असतात. त्याचे समर्थन याच मनुस्मृतीत केलेले आहे. एकंदरीत मनुस्मृतीमध्ये दाखवलेले सामाजिक विषमतेचे सगळे नियम हिंदू लोक पाळतात. त्यामुळेच हिंदू समाज विषमतेचे पोषण करणारा समाज ठरला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या विषमतेच्या विरोधात रणशिंग फुंकायचे होते. त्यामुळे त्यांनी विषमतेचे प्रतिक झालेली मनुस्मृती जाहीरपणे जाळली. तोही दिवस २५ डिसेंबरचा होता. त्यामुळे सामाजिक समतेचा पुरस्कार करणारे अनेक पुरोगामी कार्यकर्ते आज मनुस्मृती दहन दिनसुध्दा पाळत आहेत. नेमक्या याच दिवशी पुन्हा एकदा शनी शिंगणापूरचा विषय पुढे आला आहे. अहमदनगर जिल्ह्यातल्या शनी शिंगणापूरच्या मंदिरात महिलांना प्रवेशबंदी आहे. ती एका पदवीधर युवतीने मोडली आणि महाराष्ट्रात चर्चा सुरू झाली. खरे म्हणजे शनी शिंगणापूरच्या मंदिरात महिलांना प्रवेशबंदी असावी असे मनुस्मृतीतसुध्दा म्हटलेले नाही. एवढेच काय पण शनी शिंगणापूर वगळता अन्य ठिकाणच्या कोणत्याही शनी मंदिरात महिलांना प्रवेशबंदी नाही. शनी शिंगणापूरच्या मंदिरातच ती कोठून आली. याचा काही लाग लागत नाही. सातारा जिल्ह्यातील एका सोळशी या गावात नंदगिरी महाराजांनी शनीचे मंदिर उभे केले आहे. हे शनी मंदिर म्हणजे प्रति शनी शिगणापूर आहे असा या महाराजांचा दावा आहे. अर्थात ते प्रति शनी शिंगणापूर आहे हा दावा स्वघोषितच आहे. कारण हिंदू धर्मामध्ये अशा दाव्याला पुष्टी देणारी कसलीही अधिकृत यंत्रणा कार्यरत नाही. कोणीतरी मंदिर उभे करावे आणि ते प्रति बालाजी आहे असे म्हणावे. आणखी कोणीतरी मंदिर उभे करावे आणि ते प्रति पंढरपूर आहे असे म्हणावे. भोळ्या भाविकांनी तसे मानावे आणि आपल्याल प्रचिती आल्याचे सांगावे की लोकांची गर्दी उसळतेच. तेव्हा अशा प्रति शिंगणापूर होण्याच्या दाव्याला कोणी हरकत घेत नाही. मात्र सोळशीच्या या मंदिरात शनी शिंगणापूरचे नियम पाळले जातात आणि या मंदिरात महिलांना प्रवेशबंदी असल्याचा फलक तिथे लावला जातो. या फलकाच्या विरोधात काल आंदोलन झाले आणि काही महिलांनी मंदिरात प्रवेश करून देवाचे दर्शन घेतले. या मंदिरात सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे या महिलांना कोणी अटकाव केला नाही. त्यांचे स्वागतच झाले एका मराठी वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे. या महिलांना कोणी अटकाव केला नसला तरी त्यांच्या जाण्यानंतर नंदगिरी महाराजांनी मंदिर गोमूत्राने शुध्द करून घेतले असे वृत्त एका इंग्रजी वृत्तपत्रात आले आहे. महिलेच्या प्रवेशाने जे मंदिर अपवित्र होते ते मंदिर गाईच्या लघवीने शुध्द होते असे या धर्मात मानले जाते यापरते या धर्माचे अधःपतन ते कोणते असेल आणि हा समाज आधुनिक युगात कसा तग धरून राहू शकणार आहे?

●●●

न्यायस्वातंत्र्य समता हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे, पुणे-४११ ०५८ येथे छापून सर्व्हे नं.४/१२ महात्मा फुले वसाहत कोंढवा खुर्द, कमेला पुणे-४११ ०४८ येथून प्रकाशित केले.

● (या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद पुणे न्यायकक्षेत)

# भाई नावाचं वादळ



साप्ताहिक न्यायस्वातंत्र्य समताच्या माध्यमातून साहित्यिक, विचारवंत, लेखक, समाजसेवक व कला क्रीडा, राजकारण, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या मुलाखती या वृत्तपत्राच्या माध्यमातून घेण्यात येतात.

महाराष्ट्रात आपल्या कार्यशैलीने, वक्तृत्वाने समाजमनावर अधिराज्य निर्माण करणारे भारतीय दलित कोब्रा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, कोब्राराजे भाई विवेक चव्हाण यांच्याशी संवाद साधण्याचा योग आला. त्यांच्याशी संवाद साधत असताना त्यांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू उलगडत गेले. त्यांचा विद्यार्थी नेता ते संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होण्याचा प्रवास नवोदित कार्यकर्त्यांना दिशादर्शन करणारा असाच आहे.

नामांतराच्या प्रश्नावर महाराष्ट्रात आंदोलन छेडले गेले असताना या आंदोलनात विद्यार्थीदशेत असतानाच त्यात सहभाग घेऊन समाज कार्यास सुरुवात केली. विद्यार्थीदशेत असतानाच त्यांनी जोपर्यंत नामंतर होत नाही तोपर्यंत माझ्या डोक्यावरचे केस कापणार नाही. अशी भीमप्रतिज्ञा करीत ऐहिक सुखाचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. नामंतर झाले त्यानंतर केस कापल्यानंतर त्यांनी निळे कापड डोक्यावर चढवले ते आजतागायत डोक्यावर निळे कापड असलेला नेता म्हणजे अ‍ॅड. भाई विवेक चव्हाण. त्यांची ओळख महाराष्ट्राबाहेर ही पोहचलेली आहे. पुणे स्टेशन आवारात, त्यांची झलक पाहण्यासाठी चळवळीशी नाते सांगणारे सर्व लोक आतुर असतात. विशेष म्हणजे त्यांना भेटायला येणाऱ्या प्रत्येकाला ते चहा पाजल्याशिवाय सोडत नाही. चळवळीचा कार्यकर्ता भाई बरोबर चहा प्यायला नाही. असा कार्यकर्ता सापडणे दुर्मिळ.नामांतराच्या नंतर त्यांनी डोक्यावर निळे कापड परिधान केले परंतू ऐहिक सुखाचा त्याग यावर ते आजही ठाम आहेत. मनोरंजनाच्या कार्यक्रमापासून ते नेहमी दूर राहतात.

नामंतराच्या आंदोलनात तयार झालेले हे नेतृत्त्व बहरत गेले ते त्यांच्या संघटनेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत सलग २२ वर्षे ते या ठिकाणी सभा घेऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतात. त्यांचे अभ्यासपूर्ण, भाषण ऐकण्यासाठी महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून आवर्जुन लोक उपस्थित राहणाऱ्या कार्यकत्यांच्याची संख्या वर्षानुवर्षे वाढत असल्याचे दिसते.

शोषीत, पिडित, भटके यांचा आधार म्हणजे अ‍ॅड. भाई विवेक चव्हाण पुणे जिल्ह्यात विशेषतः शहरात असा एक वॉर्ड सापडणार नाही. जिथे भाई विवेक चव्हण यांच्या भारतीय दलित कोब्रा या संघटनेचा फलक सापडणार नाही. पुणे शहरातील झोपडपट्टी वासियांचे प्रश्न मांडणारा एकमेव नेता म्हणजे त्यांचा लाडका कोब्राराजे, अ‍ॅड, भाई विवेक चव्हाण जणू काय हे एक समीकरण होऊन बसले आहे. त्यांच्यासाठी भाई नेहमी तत्पर असतात. त्यांच्या या तत्परतेला हे लोक त्यांच्या प्रत्येक आंदोलनात, लहान मुला बाळासमवेत हजर असतात. व आंदोलन यशस्वी करताना दिसतात.

रस्त्यावरची लढाई, न्यायालयीन लढाई लढता लढता हा लढाऊ नेता म्हाराष्ट्रातील संवेदनशील विषय आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन दाद मागताना आपण सर्वांनी पाहिला असेल. याचे उदाहरण म्हणजे खैरलांजी प्रकरण. अन्याय अत्याचाराविरुद्ध पेटून उठणारा हा नेता मनस्वी हळवा आहे. कार्यकर्त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी आपण कमी पडतो का या प्रश्नाने विचलीत होऊन त्यांनी एकदा आपली सनद परत करण्याचा इशारा दिला होता. परंतू हजारो कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे त्यांनी तो मागे घेतला.

जयंती निमित्त कार्यकर्त्यांच्या समवेत भव्य-दिव्य मिरवणुकीने ऐऊन त्यांनी दिलेली मानवंदाना, पुणेकरांच्या चर्चेचा विषय असतो.

हत्ती, घोडे, उंट, यांच्या लवाजम्यासह येऊन मानवंदना देणारा नेता म्हणजे भई विवेक चव्हाण, शासनाने, हत्ती वरून मिरवणुक काढण्याची बेदी घातल्याने हत्तीवरून मिरवणुक होत नाही. नाहीतर हत्तीवरून येऊन मानवंदना देण्याचा त्यांचा एक विक्रम होऊन बसला असता.

२२ वर्षे एकच ठिकाण, एकच नेता, एकच संघटनाद्वारे भिमा कोरेगावच्या विजय स्थंभास मानवंदना देणारा नेता म्हणजे भाई चव्हाण, आंबेडकरी संघटना म्हटली की त्याला फुटीचा शापच परंतु भारतीय दलित कोब्रा ही संघटना त्याला आपवाद आहे. गेली २२ वर्षापुर्वी सुरू झालेली ही संघटनेचे रुपांतर आता जनशक्तीत झाल्याचे दिसुन येते. भारतीय दलित कोब्राच्या मुशीत तयार झालेले लढवय्ये कार्यकर्ते महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दिसून येतात. व या संघटनेच्या नावाखाली ते अन्याय अत्याचारा विरूध्द जन आंदोलन करताना नेहमीच दिसतात. विजयस्तंभा बद्दल भाईच्या मनात प्रचंड आदर आहे. नामांतराच्या चळवळीत नेत्यासमवेत ते भिमा कोरेगावला भेट देत. या भिमा कोरेगावची ऐतिहासिक आठवण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नविन वर्षाच्या पहिल्या रविवारी या स्थळाला आवर्जुन भेट देऊन मानवंदना देत असे. आज ही गर्दी १० ते १५ लाख लोकांपर्यंत पोहचली १ जानेवारीला भिमा कोरेगावला येऊन मानवंदना न देणारा कार्यकर्ता सापडणे दुर्मिळ, या दिवशी वाड्या-वस्त्यांवरून लोक गाड्या करून मिरवणुकीने येताना दिसतात. भिमा कोरेगावच्या विजयस्तंभाच्यी शौर्याची कहाणी घरा-घरापर्यंत पोहचल्याचे दिसते.

भाई विवेक यांच्याशी चार्चा करताना त्यांनी चळवळीच्या स्थितांतरांवर भाष्य केले ते म्हणतात. २००९ सालानंतर दलित समाजात मोठे परिवर्तन झाल्याने ते सांगतात. चळवळीच्या त्यागातून मिळालेल्या सवलतीवर बुध्दजीवी लोकांनी स्वार्थसाठी दलित नेत्यांना बदनाम व बरबाद करण्याचा कट केल्याचा ते सांगतात. २०१० सालापासुन चळवळीची धार बोथर झाल्याचे ते सांगतात. या पाच वर्षाच्या काळात, चळवळीचा धारा बोथट झाल्याने अन्याय-आत्याचारात वाढ झाल्याचे ते सांगतात. विकासाच्या नावाखाली झोपडपट्या उध्वस्त करण्याचे कारस्थान शिजत असल्याचे सांगतात. शिष्यवृत्ती वलकर मिळत नसल्याने लोकांना महागडे शिक्षण द्यावे लागत आहे. एकंदर परस्थिती भयानक असल्याने सांगुन चळवळीशी नाते सांगणारे जेव्हा स्वार्थासाठी इतर पक्षांचे झेंडे नाचवताना दिसतात. तेव्हा दुःख होत असल्याचे सांगितले. म्हणून की काय एक वर्षापुर्वी भाईंनी अज्ञातवासात राहायचे ठरवले. या वर्षात त्यांनी कोणताही कार्यक्रम अथवा अंदोलन कले नाही. त्यांची शांतता एका वादाळाची चाहूल देते की काय ? असा स्वर जनतेत आहे. त्यांचे कार्यकर्ते त्यांनी पुन्हा सक्रीय होऊन आवेशाने अभ्यासपुर्ण भाषनाने. कार्यत्यांचे मनोबल वाढवावे असे सर्वांना वाटते आहे. भाईंना अज्ञातवासात राहताना कार्यकर्ते एकच मागणी करताना दिसतात. की भाई आमच्यावरचा राग आम्ही समजु शकतो परंतु समाजाच्या आदरस्मृती स्थळांवर नको. सर्व कार्यकर्त्यांना डोक्यावर निळे कापड बांधलेले लढवय्ये नेते, कोब्राराजे भाई विवेक चव्हाण हवे आहेत.

# भिमाच्या लेकरा जरा जपून

३१ डिसेंबरची रात्र आलीय तेव्हा थोडे नमून करू नको प्लॅनिंग तु ऑफिसमधून आज लवकर निघ, घरी आई बाबा आहेत काळजी करनारे तेव्हा नको दारूचा अन् चकन्याचा ढिग; आठवतय का दर रविवारी म्हणतोस सुरा मेरय मज्ज पमादठ्ठाणा वेरमनी, मग कशाला हवे बार अन् पब मधले ते विषारी पाणी; पहा समाज कोलमडलेला त्याला घे सावरून भिमाच्या लेकरा जरा जपून ३१ डिसेंबरची रात्र आलीय तेव्हा थोडे नमून !!!

वर्षाच्या शेवटी तू आणि तुझे मित्र मरेपर्यंत एवढे का पितात त्यापेक्षा घे हातात वह्या पुस्तके अन् वाट एखाद्या अनाथाश्रमात; कर भिमाचे काम तु नको दारूचा छंद, भिमाचा लेक आहे तु एवढ्यात नको रे पडू बंद; ३१ डिसेंबरला तू पितोस व्हिस्की अन् बिअर, पण आठव भिमाकोरेगावात तुझेच पुर्वज आज तोडत होते पेशव्यांचा गिअर; एका रात्रीचा चिल्लर डॉन बनून घालशील राडा रस्त्याने ओरडून, तोडायची हिम्मत करू नको राजा कायदे अन् कानून, भिमाच्या लेकरा जरा जपून ३१ डिसेंबरची रात्र आलीय तेव्हा थोडे नमून !!!

सलाम ठोक तुझ्या त्या आईबापाला, ज्याने जन्माला घातले मर्द जयभिमवाल्याच्या घरात तुला; बाबासाहेबांचा ठेवून मान, घे शपथ पिनार नाही कधी जीवनात, कर चळवळीत काम लेका काय मजा नाही त्या अल्कोहोलात; पिऊन पडू नकोस रस्त्यावर पोलिसही घेणार नाहीत तुला खपवून, भिमाच्या लेकरा जरा जपून ३१ डिसेंबरची रात्र आलीय तेव्हा थोडे नमून !!!

शांततेचा संदेश दिला होता बुद्धाने जगाला, ढोसून करशील दंगा गल्लीत तेव्हा पुन्हा येऊ नकोस बा भिमाच्या दाराला; एवढ्याचसाठी का भिमानं वाघ केले तुला, महिन्याचा पगार सारा बाटलीत घालवायला; थोडी लाज बाळग शहारे येऊदेत अंगावर, नशा करू नको वेड्या विचार कर जेव्हा तुझे कुटूंब येईल रस्त्यावर, बाळा तुला घडविले ज्यांनी तेव्हा लहान होते तुझे विचार, मोठा झालास गड्या तु होऊ नकोस दारूपुढे लाचार; उत्तम जीवन जग तुझ्या मित्रांनाही दिसूदे तुझे चांगले गुण, भिमाच्या लेकरा जरा जपून ३१ डिसेंबरची रात्र आलीय तेव्हा थोडे नमून !!!

## संक्षिप्त बातम्या

### खडकीत भरदिवसा तरुणाचा खून

**पिंपरी (प्रतिनिधी) :** अकरा वर्षांपूर्वी केलेल्या खून प्रकरणातून निर्दोष सुटलेल्या दोन तरुणांवर सहा जणांच्या टोळक्याने हॉकी स्टिकने मारहाण करत व डोक्यात बिअरच्या बाटल्या घालत हल्ला केला. या हल्ल्यात एक तरुण मृत्युमुखी पडला, तर एकजण गंभीर जखमी झाला. ही घटना दुपारी सव्वा एकच्या सुमारास खडकी येथे घडली. संजय गोपाळ देदुंडा (वय ३२, रा. पिंपळे गुरव) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याचा सहकारी नीतेश राजेश लखन (वय ३०, रा, पिंपळेगुरव) हा गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी देवेंद्र बिडलान, धीरज बिडलान, पापा बिडलान आणि त्यांचे तीन साथीदार अशा सहाजणांवर खून व खूनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी खडकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २००४ मध्ये दिवाळीच्या पाडव्यादिवशी राजू बिडलान व अनंत बिडलान या दोघांचा खून केल्याप्रकरणी संजय, नितेश यांच्यासह काहीजण आरोपी होते. या सर्व आरोपींची या खून खटल्यातून न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

मात्र, राजू व अनंत यांच्या नातेवाईकांच्या मनात आरोपींविषयी राग होता. शनिवारी दुपारी संजय आणि नितेश हे दोघे खडकीतील औंध रस्त्यावर चव्हाणवस्ती येथे आले होते. आरोपींनी दोघांवर हॉकी स्टिक व बिअरच्या बाटल्यांनी हल्ला केला.

### देहविक्रीच्या आरोपावरून महिलेचे घर पेटवले

**अमरावती :** शहरातील अंबाविहार येथील एका घरामध्ये सुरू असलेल्या देहविक्रीविरोधात महिलांनी संताप व्यक्त केला आहे. संतप्त महिला आणि परिसरातील नागरिकांनी या घरात शिरून साहित्याची प्रचंड नासधूस करून घराला आग लावल्याची घटना घडली आहे.

अंबाविहार येथे राहणाऱ्या एका महिलेच्या घरातून देहविक्रीचा व्यवसाय होत असल्याचा आरोप आहे. पोलिसांत तक्रारी दिल्या, परंतु छापामार कारवाईदरम्यान या घरात काहीच आढळून येत नसल्याचे पोलिसांनी म्हटले होते.

मात्र देहविक्री व्यवसायामुळे परिसरातील युवती आणि महिलांनादेखील येथे येणाऱ्यांचा त्रास वाढत गेला आणि बुधवारी याचा उद्रेक झाला. या भागातील महिला मोठ्या संख्येने वाहनाने राजापेठ पोलिस ठाण्यात पोहोचल्या. ठाणेदार शिवा भगत यांच्यापुढे त्यांनी कैफियत मांडली. ठाणेदारांनी गस्त वाढविण्यासोबतच धाड टाकण्याचेदेखील आश्वासन दिले.

# संस्कृत भाषेच्या भारताबाहेरील अभ्यासाचे महत्व लक्षात घ्यायला हवे : डॉ.बहुलकर

**पुणे (प्रतिनिधी) :** वेदकाळापासून असलेल्या प्राचीन संस्कृत भाषेचा हिंदू, जैन व विशेषत: बौध्द धर्मामध्ये झालेला अभ्यास आणि त्याबरोबरच भारताबाहेर झालेला अभ्यास याचे टप्पे लक्षात घेऊन संस्कृत भाषेचे महत्व लक्षात घ्यायला हवे असे मत भांडारकर प्राच्यविद्या संस्थेचे मानद सचिव डॉ. श्रीकांत बहुलकर यांनी व्यक्त केले.



शनिवारवाडा कला महोत्सवाच्या तिसऱ्या पुष्पामध्ये डॉ. बहुलकर यांचा त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल महोत्सवाचे संयोजक आमदार विजय काळे यांच्या हस्ते पुणेरी पगडी, शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याचवेळी प्रसिध्द पखवाज वादक शशिकांत भोसले यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

डॉ. बहुलकर म्हणाले, मी काम करताना त्या कामाचे निश्चित फळ मिळेल अथवा त्यासाठी पुरस्कार मिळेल असा कधी विचार केला नव्हता. साहित्य अकादमी पुरस्कार मिळेल हेही मला माहिती नव्हते. मी केलेल्या कामाची पावती या पुरस्काराच्या रुपाने मला मिळाली आहे. खरतर पुणे शहरात शंभरी गाठलेले संस्कृत व इतर क्षेत्रात खूप काम केलेले विद्वान आहेत त्यांच्या समोर मी काहीच नाही अशी कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली.

ते म्हणाले, संस्कृत भाषेचा विचार करताना ही एक छोटी भाषा आहे असे म्हटले जाते. परंतु ५ हजार वर्षांपूर्वी प्राचीन काळात भारतात व भारताबाहेर पसरलेली भाषा आहे. अगदी अफगाणीस्थानपासून ते जपान पर्यंत या भाषेचा प्रसार झाला आहे. वेदकाळापासून या भाषेला महत्व आहे. हिंदू, बौध्द व जैन धर्मामध्ये संस्कृत भाषेविषयी विशेष कामगिरी केली आहे. भारतातील विविध धर्मातील लोकांनी संस्कृतचा अभ्यास तर केलाच परंतु भारताबाहेरही संस्कृतचा जो अभ्यास झाला त्याचे टप्पे लक्षात घेणे आवश्यक आहे. तिबेटमध्ये साडेपाच हजार संस्कृत ग्रंथांचा अनुवाद झाला आहे. मात्र हे ग्रंथ भारतात उपलब्ध नाही. त्यासाठी आपण काही पावले उचलली असल्याचे डॉ. बहुलकर यांनी यावेळी सांगितले.

या सत्कारानंतर महोत्सवाच्या समारोपाच्या दिवशी 'जिव्हाळा' निर्मित 'सुनेच्या राशीला सासू' या विनोदी नाटकाने रसिकांना पोट धरून हसायला लावले. ज्योतिष राशीतील १२ राशींवर आधारित असलेल्या या नाटकामध्ये चंद्र राशींचा सासू व सुनेवर झालेला परिणाम, विविध राशींच्या सुना आणि सासू यांचे स्वभाव विशेष, त्यातून त्यांच्या नात्यातील संबंध व त्यातून निर्माण झालेले विनोदी किस्से असलेल्या या मनोरंजनाच्या नाटकाने रसिकांची माने जिंकली. या नाटकाचे दिग्दर्शन आनंद म्हसवेकर यांनी केले असून योगिनी पोफळे, मनोहर सोमण नयना आपटे या कलाकारांनी आपल्या अभिनयातून विनोदाचा अविष्कार घडविला.

# मोदी-शरीफ भेट अमेरिकेच्या दबावाखाली : प्रकाश आंबेडकर



**पुणे (प्रतिनिधी) :** भारिप बहुजन महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांची भेट चुकीच्या वेळी आणि अमेरिका, युरोपीय देशांच्या दबावाखाली घेतली आहे.

पाकिस्तानची आर्थिक स्थिती पूर्णपणे ढासळल्यानंतर शरीफ यांच्याशी बोलणी केली असती तर ती फायदेशीर ठरली असती, असे मत व्यक्त केले. शरीफ यांनी मोदींना रिटर्न गिफ्ट म्हणून कुख्यात गुन्हेगार दाऊद इब्राहिमला भारताकडे सोपवावे, अशी मागणी भाजप कार्यकर्त्यांनी करावी, असेही त्यांनी सुचविले.

मोदी यांच्या पाकिस्तान भेटीबाबत आंबेडकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना आग्रा येथील जी-७ परिषदेत पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांच्याशी चर्चा केली.

# सुशासन दिना निमित सेवा हमी कायद्याच्या व्याख्यानाचे आयोजन



**पुणे (प्रतिनिधी) :** माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मदिनानिमित्त निमित्त सुशासन दिना निमित सेवा हमी कायद्याचे व्याख्यान उदय टेकाळे, उपायुक्त दक्षता यांनी केले. या प्रसंगी त्यांनी सुप्रशासनाची पारदर्शकता, उत्तरदायित्व प्रतिसादतमक्ता, समानता, सर्वसमावेशकता, कार्यतत्परता, कार्यक्षमता, परिणामकारकता, सहभाग, सहमती, कायदेशीरता या सुप्रशासनाची वैशिष्ट्यांचे सादरीकरणसह व्याख्यान दिले. या प्रसंगी मुख्य लेख वित्त अधिकारी उल्का कळसकर, मा.मुख्य कामगार अधिकारी शिवाजी दौंडकर, मधुकांत गरड उपायुक्त, प्रशासन अधिकारी शाम तारू,तसेच महा. सहा. आयुक्त, अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रशांत चव्हाण यांनी केले व सदर चा कार्यक्रम मनपा मुख्य भवनातील कॅप्टन वडके सभागृह येथे संपन्न झाला.

# राज्य सरकारची यंत्रणा आणि ग्राहकांची मानसिकता दोन्ही उदासीन : सूर्यकांत पाठक

**पुणे (प्रतिनिधी) :** ग्राहक संरक्षण कायदे नागरिकांच्या फायद्याचेच आहेत. मात्र, राज्य सरकारची यंत्रणा आणि ग्राहकांची मानसिकता दोन्ही उदासीन आहे, असे मत ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष सूर्यकांत पाठक यांनी पुण्यात व्यक्त केले.



ग्राहक संरक्षण संस्थेच्यावतीने राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त अन्यायाविरुध्द लढणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ग्राहक संरक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सागर शिंदे, माहिती अधिकार कार्यकर्ते विवेक वेलणकर, शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे शिरीष फडतरे, उपाध्यक्ष सुरेश पंडीत, सचिव मनीषा बोरसे आदी उपस्थित होते.

पाठक पुढे म्हणाले, ''ग्राहकांनी जागृत राहण्याची गरज आहे. कायद्यातील अनेक संरक्षणात्मक बाबींची ग्राहकांना माहितीच नसते. हे चित्र बदलायला हवे.

विवेक वेलणकर म्हणाले, प्रत्येक प्रवासी नागरिक हा ग्राहकच आहे. पूर्वी प्रवाशांची लूटमार करणाऱ्या पेंढारी लोकांच्या टोळ्या होत्या. आता हे सक्तीची टोलवसुली करणारे लूटमार आहेत. आरआयबीचे नियम वेबसाईटवर आहेत. ते प्रत्येकाने पडताळून पहावे. कोणतेही सरकार कधीच नागरिकांसाठी तळमळीने लढत नाही. त्यामुळे ग्राहकालाच विरोधी पक्षात बसण्याची वेळ आली आहे. तरी राज्य सरकारने पुण्य कमवावे आणि मुंबई- पुणे महामार्गावरील टोल कायमचा बंद करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

शिरीष फडतरे म्हणाले, ग्राहक अनेकदा कायद्यांतर्गत तक्रारी करतात, मात्र पाठपुरावा करीत नाही. ग्राहकांनी चिकाटी सोडू नये. अनेकांना तर ग्राहक संरक्षण कायदेच माहित नसतात, याचा फायदा सेवा देणाऱ्या कंपन्या घेतात.

सागर शिंदे म्हणाले, ग्राहकांना योग्य मार्गदर्शन करुन त्यांची होणाऱ्या फसवणुकीबद्दल न्याय मिळवून देणे. फसवणूक होऊ नये यासाठी मार्गदर्शन आणि जनजागृती केली जाते. त्यामुळे ग्राहक नेहमी सुरक्षित राहील.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव कुलकर्णी यांनी केले. राजीव पाटील यांनी आभार मानले.

## संक्षिप्त बातम्या

### छळाला कंटाळून वाकडमध्ये विवाहितेची आत्महत्या; पतीस अटक

**पिंपरी (प्रतिनिधी)** : मुलांच्या शिक्षणासाठी माहेराहून पैसे आणण्याच्या मागणीसाठी पतीकडून होत असलेल्या छळाला कंटाळून विवाहितीने घरातील फॅनला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना शनिवारी (दि.२६) सकाळी पहाटे पाचच्या सुमारास रहाटणी येथे उघडकीस आली.

माधुरी बालाजी शिरसाठे (वय २५, रा. रहाटणी, वाकड) असे आत्महत्या केलेल्या विवाहितीचे नाव असून तीचा पती बालाजी अभिमन्यू शिरसाठे ( रा. रामनगर, रहाटणी) याला अटक करण्यात आली आहे. यासंदर्भात विवाहितीचे वडील गणेश बागडे (वय ५०, रा. रहाटणी, चिंचवड) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माधुरी आणि बालाजी यांचा २०१० मध्ये विवाह झाला होता. त्यांना दोन मुले आहेत. मुलांच्या शिक्षणासाठी माहेराहून पैसे आण असे म्हणत बालाजी तीचा वेळोवेळी शारिरीक व मानसिक छळ करत होता. तसेच तीला मारहाण करत होता. या छळाला कंटाळून माधुरीने शनिवारी पहाटेपाचच्या सुमारास राहत्या घरी फॅनला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक व्हि. एस. धुमाळ अधिक तपास करत आहेत.

### पुण्याच्या उपमहापौरांच्या मुलावर बलात्काराचा गुन्हा

**पुणे (प्रतिनिधी) :** पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर आबा बागुल यांच्या मुलावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी हा गुन्हा एका ३८ वर्षीय महिलेच्या तक्रारीनंतर दाखल केला आहे. पीडित महिला पेशाने नर्स असल्याची माहिती मिळते आहे. बलात्काराचा गुन्हा उपमहापौर आबा बागुल यांच्या अमित या मुलाविरोधात दाखल करण्यात आला असून पीडित महिला रविवार पेठ येथे राहणारी आहे. दरम्यान, पीडित महिलेचे आरोप आबा बागुल यांनी फेटाळले असून ४ वर्षांपूर्वी आम्ही पोलिस ठाण्यात या महिलेविरोधात तक्रार केली होती आणि त्यावर सध्या न्यायालयात खटलाही सुरु असल्याची माहिती उपमहापौर आबा बागुल यांनी दिली आहे.

### हाईक तर्फे ॲप सादर

**पुणे (प्रतिनिधी) :** भारतातील सर्वांत झपाट्याने वाढणाऱ्या मेसेजिंग प्लॅटफॉर्म असलेल्या हाईक मेसेंजर तर्फे मराठी, हिंदीसह आठ भाषांमध्ये ॲप सादर करण्यात आले आहे. हे ॲप अँड्रॉईड फोन्सवर उपलब्ध असून यामध्ये बहुभाषी इंटरफेस, बहुभाषी कीबोर्ड,सूचक टेक्स्ट तंत्रज्ञान, स्टिकर्स यांसारखी वैशिष्ट्ये आहेत.

# स्वतंत्र विदर्भाच्या नावाने भाजपने निवडणूक लढून दाखवावी : पवार

**पुणे (प्रतिनिधी)** : स्वतंत्र विदर्भ राज्य करण्यासाठीचा प्रस्ताव महाराष्ट्राच्या विधिमंडळात मांडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर करून दाखवावा. म्हणजे मग विदर्भात जनमत घेण्याचीही गरज पडणार नसल्याचा उपहासात्मक सल्ला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुण्यातील एका सत्कार समारंभात बोलताना दिला. भारतीय जनता पक्षाची छोटी राज्ये करण्याची भूमिका आधीपासूनच स्पष्ट आहे. हे मत त्यांनी कधी न लपविल्यामुळे फडणवीसांना माझे एकच सांगणे आहे. त्यांनी स्वतंत्र विदर्भाच्या



नावाने निवडणूक लढवावी. त्यात तुम्हाला यश आले तर तुम्हाला आमचा पाठिंबा असेल, असे आव्हानही त्यांनी दिले.

स्वतंत्र विदर्भासाठी लढा वगैरे करायची माझी तयारी नाही, असे स्पष्ट करून पवार म्हणाले, मराठी भाषकांचे राज्य होण्यासाठी संघर्ष झाला. १०६ हुतात्मे झाल्यामुळे महाराष्ट्र एकसंघ राज्य राहण्यात अधिक आनंद आहे. विदर्भ राज्याची मागणी सामान्य लोकांनी मतपेटीद्वारे व्यक्त केली तर मी त्याचा आदर करीन. मात्र आजपर्यंत निवडणुकीत वैदर्भीय जनतेने कधीही विदर्भवाद्यांना पाठिंबा दिलेला नाही, हे स्पष्ट करतानाच ‘पुणे जिल्ह्यातून शंभर रुपये जर सरकारला गेले तर त्यापैकी २०-२२ रुपयेच पुण्यात खर्च होतात. मात्र, विदर्भातून शंभर रुपये आले, तर १२०- १२२ रुपये विदर्भावर खर्च होतात, याकडेही पवारांनी लक्ष वेधले.

सरकार फडणवीसांचे असो की देशमुखांचे, विकासाच्या कामात राजकारण न आणण्याची भूमिका सर्वांनाच घ्यावी लागेल. हे चित्र सर्वत्र दिसले पाहिजे. कोल्हापूर जिल्हा सिंचनाच्या बाबतीत क्रमांक एकचा झाला यात सरकारचे योगदान फार कमी आहे. तेथील शेतकऱ्यांनी स्वखर्चाने कामे केली. तिथले शेतकरीसुद्धा अल्पभूधारक आहेत विदर्भात जमीन जास्त आहे; परंतु विदर्भातील माणूस कष्टाळू नाही हे खरे नव्हे, असे पवार म्हणाले.

# धम्मचळवळ गतिमान करणे ही काळाची गरज : विनोद चांदमारे



**पिंपरी (प्रतिनिधी)** : राजकीय चळवळीबरोबरच धम्मचळवळ गतिमान करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशनचे पुणे जिल्हाध्यक्ष आणि कामगार नेते विनोद चांदमारे यांनी व्यक्त केले. ते देहुरोड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते बुध्दमुर्ती स्थापन केल्याचा वर्धापनदिन व रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांचा जन्मदिवस रिपब्लिकन एम्प्लाईज फेडरेशन पुणे जिल्ह्याच्या वतीने साजरा करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात ऐतिहासीक बुध्दमुर्तीस पुष्पचक्र वाहण्यात आले. डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले. उपस्थित बौध्द भंतेजींना फळवाटप करण्यात आले तर उपस्थित भीमसैनिकांना लाडु वाटप करून आनंद साजरा करण्यात आली.

यावेळी रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशनचे पुणे जिल्हाध्यक्ष, कामगार नेते विनोद चांदमारे, कोषाध्यक्ष सिध्दार्थ रणपिसे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव बाळासाहेब भागवत, रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशनचे जिल्हा कायदे सल्लागार ॲड. दिपक ओव्हाळ, महाराणा व्यापारी संघटनेचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतिश कसबे, रि.पा.ई. नेते लिंबराज कांबळे, फेडरेशनचे जिल्हा उपाध्यक्ष मदन नाईक, जिल्हा सचिव शेषेराव सुर्यवंशी, जिल्हा संघटक नारायण वानखेडे, प्रकाश चांदमारे, किशोर आवारे, अर्जुन मोरे, आत्माराम मोरे, सुधाकर मोरे, रवी मोरे, विलास मोरे इत्यादी उपस्थित होते.

# होमशॉप१८ वर्ष समाप्तीच्या महाविक्रीसाठी सुसज्ज!

पुणे (प्रतिनिधी) : संपूर्ण वर्षभर ग्राहकांना आकर्षक ऑफर्सचा लाभ देणाऱ्या होमशॉप१८ या भारतातील आघाडीच्या टिव्ही शॉपिंग चॅनलने (जे वेब आणि मोबाईलवरसुद्धा उपलब्ध आहे) वर्षसमाप्तीच्या महाविक्रीची जय्यत तयारी केली आहे. २०१५ मधील सर्वोत्तम पैकी सर्वोत्तम अशा विशेष उत्पादनांवर २१ डिसेंबर २०१५ ते ३ जानेवारी २०१६ पर्यतच्या वर्ष समाप्तीच्या महाविक्रीमध्ये किमान ६०: इतकी घसघशीत सवलत मिळणार आहे! कित्येकांसाठीचे भव्य स्वप्न असलेली रेनॉल्ट डस्टर हे बंपर पारितोषक असल्यामुळे ही ऑटोमोबाईल प्रेमींसाठीसुद्धा चांगली बातमी आहे!

या सेलविषयी बोलताना होमशॉप१८ चे मुख्य ऑपरेटिंग ऑफिसर विक्रांत खन्ना यांनी म्हंटले, ''होमशॉप१८ मध्ये संपूर्ण वर्षातील प्रत्येक विक्रीसाठी विशेष प्रकारे बनवलेल्या उत्पादनांना समोर आणणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. आमच्या वर्ष समाप्ती महाविक्रीची विशेष बाब म्हणजे त्यामध्ये एका परिपूर्ण शॉपिंग बोनाझामधील सर्व घटक एकत्र आहेत- घसघशीत सवलती, भरपूर उत्पादने, अविश्वसनीय डिल्स आणि मोठी बक्षीसे. आम्हांला विश्वास आहे की, २०१५ मधील सर्वोत्तम उत्पादने आणि वर्ष समाप्तीच्या वेळेसच्या अनोख्या ऑफर्समुळे वर्ष संपताना आणि नवीन वर्ष सुरू होताना आमच्या ग्राहकांना त्यांच्या उज्वल भविष्याची नवी झलक बघायला मिळेल.''

जर आपल्याला आपल्या पार्टी एन्सेंबलसाठी जाताना स्टार सारखे दिसायचे असेल, तर कुठे जायचे कारण नाही. मणिक्याच्या नाजुकशा इशा देओलच्या ज्वेलरी बॉक्ससह स्वत:ला खुलवा ज्यामुळे आपल्याला एक ग्लॅमरस टच मिळेल.

या बॉक्समध्ये खडे असलेल्या बांगड्या, लोलके, कानातले आणि अंगठ्या व ज्युरा पिन असेल ज्यामुळे आपण एकदम उठून दिसाल. एनसेंबल म्हणून, लवकरच येणाऱ्या कॉकटेल इव्हिनिंग्जसाठी व न्यू यीअर संध्याकाळसाठी हे परिपूर्ण आहे.

# ग्राहक चळवळ दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक व्हायला हवी : अतिरिक्त जिल्हाधिकारी

**पुणे (प्रतिनिधी)** : ग्राहक चळवळ केवळ एका दिवसापुरती मर्यादीत न राहता ती दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनायला हवी, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रदीप पाटील यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त केंद्र सरकारचे विपणन आणि निरीक्षण संचालनालय आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने आज ग्राहक प्रबोधनाच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. येथील शिवाजीनगर एस.टी. बसस्थानकाच्या आवारात हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी अन्न आणि औषध प्रशासनाचे उपायुक्त शिशिकांत केकरे, जिल्हा पुरवठा अधिकारी ज्योती कदम यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



पाटील म्हणाले, आपण प्रत्येक जण दररोज ग्राहकाच्या भूमिकेत असतो. कित्येकवेळा सेवा पुरवठादाराकडून योग्य सेवा दिली जात नाही. त्याबाबत आपण जागरूक नसतो. त्यामुळे ग्राहकाला असलेले संरक्षण आणि त्याबाबतच्या कायद्याची माहिती आणि नियमांची जाणीव करून घेण्याची आवश्यकता आहे. ग्राहक चळवळीबाबत आणि नियमांबाबत दररोज जागरूक असण्याची आवश्यकता आहे.

ग्राहकाच्या हिताचे अनेक कायदे केंद्र सरकारने आणि राज्य शासनाने केले आहेत. त्याबाबत जाणीव जागृती होण्याची आवश्यकता आहे. ही जाणीव होण्यासाठी नागरिकांनीही आपल्या हक्कांप्रती जागरूक असण्याची आवश्यकता आहे. ग्राहक चळवळ व्यापक होण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनीही योगदान देण्याची आवश्यकता आहे.

प्रदर्शनात अन्न आणि औषधे, वजने आणि मापे, राज्य परिवहन विभाग, माहिती आणि जनसंपर्क विभाग अशा विविध विभागांचे स्टॉल लावण्यात आले होते. पाटील यांनी या सर्व स्टॉलची पाहणी केली.